**सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदित सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण संस्थेची नियुक्ती करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग,उर्जा व कामगार विभाग,**
**शासन निर्णय:- क्र. एसजीए-२०१६/प्र.क्र. ४५६/कामगार-५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १३ सप्टेंबर, २०१७.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ अंतर्गत व महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना, २००२ मधील तरतूदींची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यामध्ये सद्यस्थितीत एकूण १५ सुरक्षा रक्षक मंडळ स्थापन करण्यात आली आहेत. या मंडळामार्फत उक्त अधिनियम व योजनेतील तरतूदींची अंमलबजावणी करण्यात येते. योजनेच्या खंड ५(१२) मध्ये मंडळाच्या नोंदणीकृत सुरक्षा रक्षकांसाठी शारिरीक प्रशिक्षणाची सोय करण्यासाठी पुरेशा पायाभूत सुविधा पुरविण्याबाबत, तसेच खंड ७ मध्ये शारिरीक प्रशिक्षण, सुरक्षा प्रशिक्षण आणि अग्नीशमन यंत्रणेचे प्रशिक्षण देण्याकरीता आवश्यक ती उपाययोजना करण्यासंदर्भात तरतूद अंतर्भूत आहे. तथापि, प्रशिक्षणासंदर्भातील कोणतेही सुस्पष्ट धोरण नसल्यामुळे नोंदित सुरक्षा रक्षकांना पुरेसे प्रशिक्षण प्राप्त होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच सुरक्षा रक्षकांच्या कामकाजात होणाऱ्या अमुलाग्र बदलामुळे मंडळाच्या नोंदित आस्थापनांकडून चांगल्या प्रशिक्षित सुरक्षा रक्षकांची मागणी करण्यात येत असल्यामुळे खाजगी सुरक्षा एजन्सी (नियमन) नियम, २००७ मधील कलम ५ मध्ये अंतर्भूत विषयाच्या धर्तीवर प्रशिक्षणाचा कार्यक्रम ठरवून, योजनेतील तरतूदीनुसार प्रशिक्षणासंदर्भात सर्वप्रथम धोरण आखून मंडळाच्या नोंदित सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देण्याबाबतची कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**<u>शासन निर्णय</u>** :-

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ अंतर्गत स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळांतील नोंदित सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देण्याकरीता खाजगी सुरक्षा एजन्सी (नियमन) नियम, २००७ खालील अभ्यासक्रमाच्या धर्तीवर मंडळाच्या नोंदित सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देण्यासंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात येत आहे :-

(१) मंडळातील नोंदित व कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांना महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना, २००२ मधील तरतूदीनुसार प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणाचा कार्यक्रम निश्चित करणे, प्रशिक्षण संस्थेची विहीत अटी व शर्तीच्या अधीन राहून निवड करणे इत्यादी अनुषंगिक निर्णय घेण्यासाठी कामगार आयुक्त यांचे स्तरावरील समिती गठीत करण्यात येत असून प्रशिक्षणाच्या विषयाच्या अनुषंगाने या समितीमध्ये आवश्यक तज्ञ व्यक्ती अथवा अधिकारी यांचा कामगार आयुक्त यांनी समावेश करावा.

(२) सदर समितीमार्फत निश्चित केलेल्या निकषानुसार व स्पर्धात्मक निविदा मागवून प्रशिक्षण संस्थेची निवड करण्यात यावी. प्रशिक्षण संस्थेची निवड करीत असताना समिती ही प्रत्येक सुरक्षा रक्षकांकरीता प्रशिक्षणासाठी येणारा खर्च संस्थेकडील उपलब्ध प्रशिक्षित प्रशिक्षक, उपलब्ध पायाभूत सुविधा, तसेच प्रशिक्षण संस्थेचे प्रशिक्षणाचे ठिकाण इत्यादी बाबींची पूर्तता होते किंवा कसे हे पाहणे आवश्यक राहील आणि समितीमार्फत निवड केलेल्या प्रशिक्षण संस्थेने समितीमार्फत सदर संस्थेचे वार्षिक मुल्यमापन करुन शासनास अहवाल सादर करणे बंधनकारक राहील. समितीच्या निवड प्रक्रियेस शासनाची मान्यता घ्यावी.

(३) वरील प्रशिक्षणाव्यतिरिक्त मंडळामध्ये नोंदित असलेले व कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षकांना खाजगी सुरक्षा एजन्सी (नियमन) नियम, २००७ अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांतील नियम-५ मधील तरतूदींमध्ये अंतर्भूत असलेला प्रशिक्षण कालावधी, प्रशिक्षणाचे विषय इत्यादीनुसार प्रशिक्षणाची आखणी करण्यात यावी.

(४) सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देण्याकरीता प्रशिक्षण संस्थेकडे उप महासमादेश, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी खाजगी सुरक्षा रक्षक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याकरीता मंजूर केलेला परवाना (अनुज्ञाप्ती) संस्थेकडे असणे आवश्यक राहील.

(५) परवानाधारक प्रशिक्षण संस्थेकडे कमीत कमी पाच वर्षाचा (५ वर्षे) सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देण्याचा अनुभव असणे आवश्यक राहील.

(६) उप महासमादेश, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी परवाना (अनुज्ञाप्ती) मंजूर करताना दिलेल्या अटीनुसार संस्थेकडे आवश्यक त्या पायाभूत सुविधा (Infrastructure) उपलब्ध असणे बंधनकारक राहील.

(७) प्रशिक्षण संस्थेकडे प्रामुख्याने प्रशिक्षण देण्याकरीता उत्तम दर्जाचे व अनुभवी माजी सैनिक असल्यास संस्थेस प्राधान्य देण्यात यावे.

(८) विहीत केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमानुसार प्रत्येक सुरक्षा रक्षकास प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण करावे लागेल. यशस्वीपणे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण संस्थेकडून प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.

(९) कामगार आयुक्त किंवा त्यांनी नियुक्त केलेले सक्षम अधिकारी वेळोवेळी प्रशिक्षण संस्थेमधील प्रशिक्षणाच्या सुविधांची वेळोवेळी तपासणी करतील. साधारणत: अशी तपासणी वर्षातून दोनवेळा करणे बंधनकारक राहील.

(१०) प्रशिक्षण संस्थेने यशस्वी प्रशिक्षणार्थिंची नियंत्रक अधिकारी म्हणून कामगार आयुक्त यांना त्यांनी विहीत केलेल्या नमुन्यामध्ये यादी देणे संस्थेस बंधनकारक राहील.

(११) नियंत्रण अधिकाऱ्याने विहीत केलेले प्रशिक्षण, सुरक्षा रक्षक शासन मान्य प्रशिक्षण केंद्रामध्ये पूर्ण करेल. प्रशिक्षण केंद्राने दिलेले प्रशिक्षणास सक्षम अधिकारी मंजूरी देईल किंवा त्याच्या अधिकाऱ्याकडून तपासणी करुन मंजूरी देईल. प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक प्रशिक्षार्थिंना प्रशिक्षण संस्था प्रमाणपत्र देईल.

(१२) नियंत्रण अधिकारी वेळोवेळी प्रशिक्षण सुविधा आणि कार्ये याची तपासणी स्वत: अथवा त्याचे इतर अधिकारी यांजकडून करेल. सर्वसाधारणपणे अशी तपासणी वर्षातून २ वेळा केली जाऊन, तपासणी केल्यानंतर/झाल्यानंतर संबंधित सक्षम अधिकारी प्रशिक्षण केंद्रास प्रमाणित करेल.

(१३) प्रशिक्षण देणाऱ्या एजन्सी यशस्वी प्रशिक्षणार्थिंची यादी विहीत केलेल्या पध्दतीनुसार नियंत्रण अधिकाऱ्याकडे देतील.

(१४) प्रत्येक ३ वर्षानंतर कमीत कमी १ आठवड्याचे प्रशिक्षण सर्व सुरक्षा रक्षक आणि पर्यवेक्षकांनी घेणे आवश्यक असून, असे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षण केंद्राने त्याप्रमाणे प्रमाणपत्र दिले पाहिजे.

राज्यातील सुरक्षा रक्षक मंडळांमध्ये नव्याने भरती अथवा नोंदणी करण्यासाठी इच्छुक उमेदवारांना भरतीपूर्व प्रशिक्षण देण्यासाठी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या संस्थांमार्फत कामगार विभागाने निश्चित केलेल्या अभ्यासक्रमाच्या धर्तीवर सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण पूर्व कार्यक्रम राबविता येईल किंवा कसे? याबाबत सदर विभागाशी विचारविनियम करुन ठराविक कालावधीकरीता भरतीपूर्व प्रशिक्षण कार्यक्रम तसेच नोंदित सुरक्षा रक्षकांना वरील नमुद अभ्यासक्रमाच्या धर्तीवर प्रशिक्षण देण्याबाबत निश्चित करण्याचा विचार करण्यात येत आहे. याबाबत सदर विभागाशी विचारविनिमय करुन स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येतील.

सदरहू शासन निर्णय हा महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ चे कलम ८(४) अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१७०९१३१६०६२०९९१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Sanjay Vithoba Kalbhor
Date: 2017.09.13 17:06:04 +05'30'

**( संजय काळभोर )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
३) मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
४) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक.
५) उप सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) कामगार आयुक्त, कामगार भवन,सी-२०, ई-ब्लॉक,वांद्रे-कुर्ला संकुल,वांद्रे(पूर्व),मुंबई-५१.
७) सह कामगार आयुक्त,कामगार भवन,सी-२०, ई-ब्लॉक,वांद्रे-कुर्ला संकुल,वांद्रे(पूर्व),मुंबई-५१.
८) उप कामगार आयुक्त, कामगार भवन,सी-२०, ई-ब्लॉक,वांद्रे-कुर्ला संकुल,वांद्रे(पूर्व),मुंबई-५१.
९) सहायक कामगार आयुक्त, कामगार भवन,सी-२०, ई-ब्लॉक,वांद्रे-कुर्ला संकुल,वांद्रे(पूर्व),मुंबई-५१.
१०) महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक सल्लागार समितीचे सर्व सन्माननीय सदस्य.
११) अध्यक्ष, सर्व सुरक्षा रक्षक मंडळे.
१२) निवडनस्ती (कामगार-५).